रजि. नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ८७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

**नोटीस**

जा.नं.एसएसएसटी / विद्युत / 252 / २०२३
दिनांक :- 19 APR 2023

प्रति,
मे. कमल एंटरप्राईजेस,
डि-००६, रुम नं.३३, चारकोप श्री,
रामेश्वर सीएचएस लि., सेक्टर-०८, प्लॉट नं. ८१२,
साईई सिद्धी ब्स जवळ, कांदिवली पश्चिम,
मुंबई-४०००६७

**विषय :- आपले फर्मचे नाव पुढील तीन वर्षाकरीता "काळ्या यादीत" समावेश करणेत येत असलेबाबत...**
**संदर्भ :-** ०१). आपले दिनांक २०-०२-२०२३ रोजीचे दरपत्रक
०२). जा. क्र. एसएसएसटी/विद्युत/०९/२०२३ दिनांक ०३-०४-२०२३ अन्वये देण्यात आलेला कार्यादेश.
०३). दि. ०३-०४-२०२३, दि. १०-०४-२०२३ तसेच दि. १२-०४-२०२३ रोजी पाठविण्यात आलेला ई-मेल.

विद्युत विभागाचे डेडस्टॉक, कन्झ्युमेबल साहित्य, प्रत्यक्ष वापरात असलेले, तफावत असलेले साहित्य, स्क्रॅप साहित्य, विभागाकडे उपलब्ध असलेले परंतू सदर साहित्याची नोंद नसलेले, विभागाकडील सर्व दस्तऐवज तसेच स्टोअरला उपलब्ध असलेल्या विद्युत संबंधीत सर्व साहित्याचे लेखापरिक्षण करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविणेत आलेली होती. त्यास अनुसरून आपण संदर्भ क्र. ०१ अन्वये दरपत्रक सादर केले होते. आपण दिलेले निम्नत्तम दर मंजुर झालेले असल्याने आपणास संदर्भ क्र. ०२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता.

सदरहू कार्यादेशानुसार विद्युत विभागाचे डेडस्टॉक, कन्झ्युमेबल साहित्य, प्रत्यक्ष वापरात असलेले, तफावत असलेले साहित्य, स्क्रॅप साहित्य, विभागाकडे उपलब्ध असलेले परंतू सदर साहित्याची नोंद नसलेले, विभागाकडील सर्व दस्तऐवज तसेच स्टोअरला उपलब्ध असलेल्या विद्युत संबंधीत सर्व साहित्याचे ऑडिटचे काम तातडीने सुरु करणेकामी आपणाकडून कामाचे वेळापत्रक मिळणेबाबत, आपणामार्फत नियुक्त ऑडीटर यांचे नावे व संपर्क क्रमांक मिळणेबाबत, विद्युत संबंधीत सर्व साहित्याचे तसेच कन्झ्युमेबल स्टॉकमधील साहित्याचे ऑडीट संबंधीत कामकाज देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार कधीपासून सुरु करणार आहे तसेच कार्यादेश प्राप्त झालेबाबत Letter of Work Order Acceptance बाबत तसेच सदरचे काम कार्यादेशातील व निविदेतील अटी शर्तीनुसार विहीत वेळेत पुर्ण होणेचे दृष्टिकोनातून आपणास संदर्भ क्र. ०३ चे ई-मेलव्दारे वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

परंतू, आपणास वेळोवेळी पाठविण्यात आलेल्या कोणत्याही ई-मेलला आपण प्रतित्युर दिलेले नसून, आपणाशी मोबाईल दुरध्वनीव्दारे तसेच संदेशाव्दारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, आपणाकडून कॉलला तसेच संदेशास कोणताही प्रतिसाद मिळत नाही. तसेच आपणास संदर्भ क्र. ०२ अन्वये देण्यात आलेला कार्यादेश आपण स्विकारलेला नसून उलट टपाली सदर कार्यादेश सिलबंद पाकीटासह संस्थान आवक क्र. ७५५ दि. ११-०४-२०२३ रोजी संस्थानला प्राप्त झालेला आहे.

त्यामुळे आपण विद्युत विभागाचे डेडस्टॉक, कन्झ्युमेबल साहित्य, प्रत्यक्ष वापरात असलेले, तफावत असलेले साहित्य, स्क्रॅप साहित्य, विभागाकडे उपलब्ध असलेले परंतू सदर साहित्याची नोंद नसलेले, विभागाकडील सर्व दस्तऐवज तसेच स्टोअरला उपलब्ध असलेल्या विद्युत संबंधीत सर्व साहित्याचे ऑडीट तथा लेखापरिक्षण करणेस इच्छुक नसल्याचे दिसून येत आहे.

२/-

तरी, उपरोक्त सर्व गोष्टींचा सारासार विचार करता, आपल्याकडुन आपणास देण्यात आलेल्या कार्यादेशातील कामाबाबत कोणताही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने आपले फर्मचे नाव पुढील तीन वर्षाकरीता संस्थानचे **"काळ्या यादीत"** समाविष्ठ करणेत येत असून, आपणास पुढील तीन वर्षाचे कालावधीमध्ये संस्थानचे कोणत्याही प्रकारच्या ई-निविदा व कोटेशन प्रक्रियेत भाग घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(राहूल जाधव)
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**